पोलीस स्टेशन, गाडगे नगर
अमरावती शहर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** गाडगे नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0938 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/11/2025 14:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 04/09/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/09/2025
**Time From (वेळेपासून):** 17:34 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/11/2025 **Time (वेळ):** 14:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 042
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/11/2025 14:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सार्वजनिक बांधकाम विद्युत , विभाग, विभागीय कार्यालय ,अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुनिल विष्णु किनगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1971

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधिक्षक, न्टी करप्शन ,ब्युरो, अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधिक्षक, न्टी करप्शन ,ब्युरो, अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823111155

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.रोहण चंद्रषेखर पाटिल कार्यकारी अभियंता वर्ग 1 सार्वजनिक बांधकाम विद्युत विभा | | | 1. ह मु साईनगर अमरावती मुळ पत्ता,कल्पतरु नगर, अशोका मार्ग, ,नाशीक ता जि नाशीक, गाडगे नगर,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकीकत -विषय:- आलोसे श्री.रोहण चंद्रषेखर पाटिल, वय 35 वर्शे, पद- कार्यकारी अभियंता वर्ग 1, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, विभागीय कार्यालय अमरावती ह.मु.साईनगर अमरावती मुळ पत्ता - कल्पतरु नगर, अशोका मार्ग, नाशीक ता.जि.नाशीकायांचे विरूध्द कलम 7(a) ला.प्र.का. 1988 प्रमाणे गुन्हा नोंद होणेबाबत .मी सुनिल विशु किन्गे, वय 54 वर्षे, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी माहे जुलै 2025 पासून लाचलुचपत प्रतिबंध विभाग, अमरावती येथे नेमणुकीस आहे. दिनांक 04/09/2025 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.निखील अंनतराव शेळके, वय-34 वर्ष, शिक्षण -शासकीय कंटात्रदार बेझ ॲटोमेषन ॲन्ड इलेक्ट्रीकल शेगाव ता.शेगाव जि.बुलढाणा रा.चांदबाई प्लॉट, बस स्टॅन्ड जवळ शेगाव ता.शेगाव जि.बुलढाणा यांनी लाप्रवि कार्यालय येथे हजर येवून लेखी तक्रार दिली की, ''मी वरील पत्यावर राहत असून शासकीय कंटात्रदार असून इलेक्ट्रीक च्या कामाचे शासकीय ठेके घेत असतो. मी आणि माझे सोबत माझे मित्र श्री.समीर अतकरे असे आज दिनांक 04/09/2025 अमरावती येथे आलो त्यांनतर मला कार्यकारी अभियंता सा.ब.विद्युत विभाग अमरावती मार्फतीने बुलढाणा जिल्हयातील इलेक्ट्रीकल चे मिळालेले होते. सदर कामाचे अंदाजपत्रक क्रमांक 985, 1304, 158 असे आहे त्याबाबत श्री.रोहन पाटील कार्यकारी अभियंता, सा.ब.विद्युत विभाग अमरावती यांना मला भेटण्याकरीता गेलो असता, त्यांनी मला सांगितले की, सदर तिन्ही काम हे एकूण 17,94,000/- रुपयाचे होतात तर तुम्ही मला 2 टक्के प्रमाणे 35,000/- रुपये दया, तसेच तुम्ही बुलढाणा येथील जूने शासकीय विश्रामगृहाचे नुतणीकरण या कामाचे अंदाजपत्रक क्रमांक 186 ची वर्क ऑर्डर सुध्दा घेवून जा असे म्हटले त्यावेळी मी सर बघतो असे म्हणून मी आणी माझे मित्र श्री.अतकरे त्याठिकाहून निघून आलो. मला बुलढाणा येथील जूने शासकीय विश्रामगृहाचे नुतणीकरण या कामाचे अंदाजपत्रक क्रमांक 186 ची वर्क ऑर्डर घेणे गरजेचे असून श्री.रोहन पाटील कार्यकारी अभियंता यांनी मला माझे मागील झालेले तिन कामाच्या 17,94,000/- रक्कमेच्या 02 टक्के 35,000/- रुपये लाचेची मागणी करीत आहे. तसेच सदरची लाच रक्कम हे श्री.पाटील साहेब हे ब्राउन रंगाच्या कागदी लिफाप्यात घेतात. मला श्री.रोहन पाटील साहेबांना 35,000/- रुपये लाच रक्कम देण्याची इच्छा नाही तरी, त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करीता आपणाकडे लेखी तक्रार देत आहे. श्री. रोहन पाटील कार्यकारी अभियंता, सा.ब.विद्युत विभाग, अमरावती यांचे सोबत माझा कोणताही आर्थिक व्यवहार नसुन, त्यांच्याशी माझा कोणत्याही प्रकारचा वाद नाही. तरी श्री.रोहन पाटील कार्यकारी अभियंता,सा.ब.विद्युत विभाग अमरावती यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विंनती आहे."सदर तक्रारीचे अनुशंगाने मा.परिवहन अधिकारी, प्रादेषिक परिवहन विभाग कार्यालय अमरावती यांना पत्र देवून पंच क्र.1 श्री.कुणाल सुधाकर कुथे, पद - मोटार वाहन निरीक्षक, व पंच क्र. श्री.वैभव रमेष यादव, पद - सहायक मोटार वाहन निरीक्षक यांना पंच म्हणून बोलाविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांचा व पंचाचा परिचय करुन दिला. त्यानंतर त्यांची लेखी दिलेली तक्रार पंचांना वाचणेस देवून तक्रारदार यांना त्यांची दिलेल्या लेखी तक्रारीबाबत पंचाना तोंडी माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी पंचासमक्ष तसेच सर्व सापळा पथकासमक्ष थोडक्यात तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. दोन्ही पंचानी तक्रार वाचली व तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर लागलीच पडताळणी कारवाई करण्याचे सांगुन पडताळणी बाबतच्या तक्रारदार, दोन्ही पंच तसेच सापळा पथकातील अधिकारी अमंलदार यांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.हवा.युवराज राठोड व्हाईस रेकॉर्डर सुरु पंच क्र. 1 श्री.कुथे यांचेसह सा.बां. विद्युत विभाग अमरावती कार्यालय येथे श्री.रोहन पाटिल यांची भेट घेण्याकरीता रवाना केले त्यांनतर अंदाजे अर्ध्या तासाने पंच क्र.1 श्री.कुथे व तक्रारदार श्री.शेळके एसीबी कार्यालयात परत आले असता, तक्रारदार श्री.शेळके यांना पंच क्र.

2श्री.यादव यांचेसमक्ष हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की, ''माझे आणि श्री.पाटिल साहेब यांचेमध्ये माझे कामाबदल चर्चा झाली तसेच त्यांनी सांगीतले की, ''हो ना हे त बिलाचे होते ना तुमचे, बिलाचे बाकीच आहे ना अजून " असे म्हटले असता, त्यावर मी श्री.रोहन पाटिल यांना म्हटले की, "हव बिलाचे बाकी आहेत " असे म्हटले त्यावर श्री.रोहन पाटिल यांनी म्हटले की,''वर्क ऑर्डर च मी वर्क आर्डर च विचारत आहे'' त्यावर मी श्री.रोहन पाटिल यांना म्हटले की, ''वर्क ऑर्डर च आपण किती करतो जनरली तरी, त्यावर श्री.रोहन पाटिल यांनी म्हटले की, ''ते माहित आहे ना तुम्हाले'', त्यावर मी त्यांना " सर पण... बर सर मंग हे " असे म्हटले, त्यावर श्री.रोहन पाटिल यांनी म्हटले की, ''तुम्ही वर्क ऑर्डर करायची होती ना , माझ्या याच्यात दिसत नाही यार आणि नोटींग पण नाही आहे ''त्यावर मी श्री.रोहन पाटिल यांना म्हटले की, "जावू दया मंग करुन देईल छोटीशीच आहे, त्याच्यातल सांगा काही सर " असे म्हटले त्यावर श्री.रोहन पाटिल यांनी ''याच्यातल काय ", असे म्हटले असता ,त्यावर मी श्री.रोहन पाटिल यांना म्हटले की, कमी करात येत असेल तर" असे म्हटले त्यावर श्री.रोहन पाटिल यांनी म्हटले की,''ते तुला ते याच्या नुसार कराव लागेल, कितीची आहे ति वर्क ऑर्डर''त्यावर मी श्री.रोहन पाटिल यांना म्हटले की,''ती साडे सहा की सात लाखाची आहे सर वर्क ऑर्डर"त्यावर श्री.रोहन पाटिल यांनी म्हटले की, ''कर तु काय वाटते त'', त्यावर मी त्यांना "तरी सांगुन दया न सर अज नाराज" असे म्हटले, असता त्यावर श्री.रोहन पाटिल यांनी म्हटले की,''तुला बघ कस जमते ते, ठिक आहे ते बघ तुला काय योग्य वाटते ते कर''अषी हकीकत तक्रादार व पंचानी सांगीतली, तसेच ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले संभाशण हे ए◌ैकण्यात आले असता तक्रारदार व पंचानी सांगीतलेल्या नुसार आहेत. दिनांक 04/09/2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. निखील षेळके यांना सा.बां. विद्युत विभाग अमरावती येथील श्री.रोहन पाटिल यांना भेटले असता आलोसे श्री. रोहन पाटिल यांनी तक्रारदार यांना कार्यकारी अभियंता सा.ब.विदयुत विभाग अमरावती मार्फतीने बुलढाणा जिल्हयातील इलेक्ट्रीकल चे मिळालेले कामे अंदाजपत्रक क्रमांक 985, 1304, 1583 याबाबत चर्चा केल्याचे दिसुन आले. तसेच तक्रारदार यांनी तक्रारी नमुद केले नुसार आलोसे श्री.रोहन पाटिल यांनी तक्रारदार यांना बिलाचे होते ना तुमचे, बिलाचे बाकीच आहे ना अजून" मागील जुन्या कामाचे 35,000/- तसेच नविन टेंडर चे ते तुला ते याच्या नुसार कराव लागेल, कितीची आहे ति वर्क ऑर्डर असे म्हणून त्या वर्कऑर्डर चे 6,000/- असे मिळून एकूण 41,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे निश्पन्न झाले. परंतु तक्रारदार यांनी सर्वानसमक्ष सांगीतले की, त्यांना खामगाव येथे अत्यंत महत्वाचे कामात जाणे आहे, तसेच आता त्यांच्या जवळ सापळा कार्यवाही करीता लाच रक्कम देण्याकरीता पैसे नाही त्यामुळे त्यांनी लाच रक्कम घेवून येतो त्यानंतर आपण सापळा कार्यवाही करावी अशी विनंती केल्याने, जेव्हा तक्रारदार श्री.शेळके हे लाच रक्कम घेवून येतील तेव्हा सापळा कार्यवाही आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व आम्हा पंचाना गोपनियतेबाबत सुचना दिल्या. सदर कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पुर्व व पडताळणी पंचनामा करण्यात आला. त्यानंतर दिनांक 29/09/2025 रोजी तक्रारदार श्री.शेळके हे लाप्रवि कार्यालय अमरावती येथे आलो आणि त्यावेळी त्यांनी सांगीतले की, आज मला टेंडर प्रक्रिये संदर्भात सा.बा.विद्युत विभाग कार्यालय अमरावती येथे जायचे आहे तसेच श्री.रोहन पाटिल यांनी मला लाच मागणी केलेली एकूण 41,000/- रुपये माझे जवळ जमले आहे तर आज रोजी आपण सापळा कार्यवाही करु असे सांगीतले वरुन तात्काळ दोन्ही शासकीय पंच यांना बोलाविण्यात आले. त्यांचे समक्ष तक्रारदार श्री.शेळके यांनी सापळा कार्यवाही बाबत सांगुन श्री.रोहन पाटिल यांना दयावयाची लाच रक्कम 41,000/- रुपये हजर केले त्यावेळी सर्व नोटांना अॅथ्रासिंन पावडर लावण्यात येवून सापळा पुर्व ची कारवाई करण्यात येवून लागलीच तक्रारदार श्री. शेळके यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन व लाच रक्कम 41,000/- रुपये देवून लगेच तक्रारदार श्री.शेळके व पंच क्रमांक 1 श्री.कुथे यांना श्री.रोहन पाटिल यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ तक्रारदार यांचे मित्र तसेच सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी रवाना झालो तसेच पंच क्र.2 श्री.यादव शासकिय वाहनाने सा.बा.विद्युत विभाग कार्यालय अमरावती च्या बाजूला रस्त्याने थांबले. परंतु श्री.रोहन पाटिल हे कार्यालयात हजर नसल्याने बराच वेळ तक्रारदार व पंच क्र.1 यांनी वाट पाहून लाच रक्कम स्विकारण्याचा ईशारा न करता त्याठिकाहून ला.प्र.वि. कार्यालयात परत आले त्यावेळी तक्रारदार यांनी सर्वांनसमक्ष सांगीतले की, लोकसेवक श्री.पाटिल हे जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथील मिटींग मध्ये व्यस्त असल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यामुळे त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही परंतु तक्रारदार यांनी सर्वांसमक्ष सांगीतले की, सोमवार दिनांक 06/10/2025 रोजी सकाळी साडे दहा च्या सुमारास जर मी लोकसेवक श्री.पाटिल यांना लाच रक्कम देण्यास गेलो तर ते लाच रक्कम स्विकारलतील त्यामुळे सर्वानुमते दि.06/10/2025 रोजी सोमवार रोजी सापळा कार्यवाही आजमाविण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अमंलदार या सर्वांना गोपनियतेच्या सुचना देण्यात आल्या. सदर कारवाईचा सविस्तर सापळा पुर्व व सापळा पंचनामा क्र.1 हे करण्यात आले आहे.दिनांक 07/10/2025 रोजी तक्रारदार श्री.शेळके यांनी मा.पोलीस अधीक्षक साहेब, ला.प्र.वि.अमरावती यांना मेलव्दारे कळविले की, त्यांचे

दिनांक 06/10/2025 रोजी सर्व मागील बिलाचे काम तसेच टेंडर चे काम झाले असून ईमेलव्दारे ऑर्डर प्राप्त झाली आहे. आता श्री.रोहन पाटिल यांचेकडे त्यांचे कोणतेही काम प्रलंबित नसून आपणाकडे दिलेल्या तक्रारीवर आपण योग्य ती कारवाई करावी. त्यावरुन आम्ही तक्रारदार श्री.शेळके यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क करुन त्यांना कार्यालयात येण्यास सांगीतले वरुन ते दिनांक 17/10/2025 रोजी कार्यालयात हजर झाले त्यावेळी दोन्ही पंचाना बोलावून त्यांचे समक्ष तक्रारदार यांना विचारणा केली असता, तक्रारदार श्री.शेळके यांनी पंचासमक्ष सांगीतले की, आता माझे काम श्री.रोहन पाटील यांचेकडे प्रलंबित नाही तसेच ते आता माझेकडून लाच रक्कम घेणार नाही त्यामुळे आपण पुढिल कायदेशीर कार्यवाही करावी त्यावेळी तक्रारदार श्री.शेळके यांनी त्यांचे हस्ताक्षर त्यांचे निवेदन लिहून दिले तसेच सांगीतले की, श्री.रोहन पाटिल हे लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता नसल्याने त्यांचेविरुध्द पुढील कायदेशीर कार्यवाही करावी असे लेखी निवेदन दिले आहे.एकंदरीत तक्रारदार श्री.निखील अंनतराव शेळके, वय-34 वर्ष, शीक्षण -शासकीय कंटात्रदार रा.चांदबाई प्लॉट, बस स्टॅन्ड जवळ शेगाव ता.शेगाव जि.बुलढाणा यांनी दिनांक 04/09/2025 रोजी दिलेल्या तक्रारी वरुन करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे श्री.रोहण चंद्रषेखर पाटिल, वय 35 वर्शे, पद- कार्यकारी अभियंता वर्ग - 1, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, विभागीय कार्यालय अमरावती ह.मु.साईनगर अमरावती मुळ पत्ता - कल्पतरु नगर, अषोका मार्ग, नाषिक ता.जि.नाषिका यांनी तक्रारदार श्री.नितिन शेळके यांचे मागील जुन्या कामाचे 35,000/- तसेच नविन टेंडर वर्क ऑर्डर चे 6,000/- असे मिळून एकूण 41,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे निशपन्न झाले. अशाप्रकारे आरोपी लोकसेवक यांनी लोकसेवक या पदाला न शोभणारे गैरवर्तन केले आहे. त्यांचे हे कृत्य गुन्हा कलम 7(a) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने त्यांचे विरुध्द सदर कलमान्वये गुन्हा नोंद करण्याकरीता माझी कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Sonali Ramesh Sonawane
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** ATUL GOWARDHAN
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 1510100040AGWM840